सकाळ
कोल्हापूर, बुधवार, १७ ऑक्टोबर २०१८ | ७

# दुर्मीळ दिवाळी अंक संग्रहाचे प्रदर्शन सुरू

कोल्हापूर, ता. १६ : शिवाजी विद्यापीठाच्या बॅरिस्टर बाळासाहेब खर्डेकर ज्ञानस्रोत केंद्रात वाचन प्रेरणा दिनानिमित्त दुर्मीळ दिवाळी अंकांच्या प्रदर्शनास सुरुवात झाली. प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते त्याचे उद्‌घाटन झाले.

भारतरत्न डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांच्या जयंतीनिमित्त वाचन प्रेरणा दिवस साजरा होतो. त्यानिमित्त विद्यापीठाच्या खर्डेकर ज्ञानस्रोत केंद्रातर्फे प्रकाशित झालेल्या दुर्मीळ दिवाळी अंकांचे प्रदर्शन भरविले आहे. १८ पर्यंत सर्वांना पाहण्यासाठी मोफत खुले राहणार आहे. खर्डेकर ज्ञानस्रोत केंद्राच्या संगणकीय वाचक प्रवेश नोंद प्रणालीचे कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांच्या हस्ते उद्‌घाटन करण्यात आले. या प्रणालीद्वारे ग्रंथालयात येणाऱ्या प्रत्येक वाचकाची संगणकीय नोंद होणार आहे. याप्रसंगी वित्त व लेखाधिकारी व्ही. टी. पाटील, ज्ञानस्रोत केंद्राच्या संचालक डॉ. नमिता खोत, उपग्रंथपाल डॉ. डी. बी. सुतार, सहायक ग्रंथपाल डॉ. पी. बी. बिलावर, डॉ. एस. व्ही. थोरात, डॉ. शालिनी लिहितकर उपस्थित होते.



**कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या बॅरिस्टर बाळासाहेब खर्डेकर ज्ञानस्रोत केंद्रात वाचन प्रेरणा दिनानिमित्त दुर्मीळ दिवाळी अंकांच्या प्रदर्शनप्रसंगी प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, वित्त व लेखाधिकारी डॉ. व्ही. टी. पाटील, डॉ. नमिता खोत.**